# Report (2022-2023)
## Pre-Examination Guidance Workshop

The department of English, Toshniwal Arts, Commerce and Science College, Sengaon organized Pre-Examination Workshop on 21st November, 2022 in Auditorium Hall. The workshop was student centric and addressed basic issues of examination process. The chairman of the programme was Dr. S. G. Talnikar, principal of the college. The chief guest of the workshop was Dr. Rajesh A. Joshi, IQAC coordinator, TACSC Sengaon. The resource person of this workshop was Dr. Datta G. Sawant, Assistant Professor of English, TACS College, Sengaon. Dr. Rajesh S. Gore, Head, department of English and Mr. Kiran Jadhav, Dr. Vijay Kolhe, faculty of English were present on the stage.

At the outset, in the introductory remark, Dr Gore told the students that basic and proper preparation is needed before appearing the final examination. Examination is the key factor in teaching-learning process. The students will get success in the examination by doing hard work consistently. He explained the main objective of the workshop is to make aware students about the writing process and mechanism of examination. The principal shared his views on this occasion. He told students that they should face examination without taking any kind of mental pressure. Students should follow certain rules and disciplines in the examination. They should collect their hall ticket before two or three day to avoid hustle-rustle in examination. Dr. R. A. Joshi expressed his views on examination process, semester and CBCS pattern, grading system to the students. He also told code of conduct for the examination.

Dr. Sawant guided to the students about entire examination process in the simple and lucid manner. He shared entire mechanism of examination, how to see time-table, seating management in the classroom, and how to search seat no. He gave basic information of filling a cover page by displaying the model answer sheet to students. He gave information about (where and how) to write

on the answer sheet. Student must be writing in error free manner in answer sheet. He also said to students, 'your handwriting should be neat because it replicates your nature'. The workshop was helpful for the students before appearing the examination. Department of English received huge response from the side of students of our college for this Pre-Examination workshop. One hundred fifteen (115) students were present for this workshop. The teaching and non-teaching staff members of the college were present for workshop. The programme was anchored by Dr. R. S. Gore and vote of thanks offered by Dr. B. B. Ghute.











# पूर्व-परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

सेनगाव: येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक २१ नोव्हेंबर रोजी पूर्व-परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, प्रमुख पाहुणे म्हणून आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. आर. ए. जोशी, कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती डॉ. डी. जी. सावंत व इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आर. एस. गोरे हे मंचावर उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना डॉ. गोरे यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी पूर्णपणे तयार असणे गरजेचे असून त्यासाठी त्यांनी सर्व प्रकारची पूर्व तयारी केली पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यानंतर डॉ. जोशी यांनी परीक्षेविषयी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यामध्ये परीक्षा काळात विद्यार्थ्यांवर कसा ताण येतो व तो कसा विद्यार्थ्यांनी हाताळावा याबद्दल मार्गदर्शन केले. अभ्यासाचे व्यवस्थित नियोजन केले तर परीक्षेत ताण येणार नाही असे मत त्यांनी मांडले. त्यानंतर कार्यशाळेचे साधन व्यक्ती डॉ. सावंत यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी व त्या दृष्टीने कसे तयार राहावे याचे मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी परीक्षेला लागणाऱ्या साहित्य पासून ते परीक्षा वर्गात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याबद्दल सांगितले. त्यानंतर आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य तळणीकर यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेचा कोणताही अतिरिक्त ताण घेऊ नये असे आवाहन करून विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आर. एस. गोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. बी. बी. घुटे यांनी केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



हिंगोली, शुक्रवार, दि. २५ नोव्हेंबर २०२२

# सेनगाव : तोष्णीवाल महाविद्यालयात कार्यशाळा

## कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पूर्व परिक्षा मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन...

सेनगाव : येथील तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २१ नोव्हेंबर रोजी पूर्व-परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेसाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. तळणीकर, प्रमुख पाहुणे म्हणून आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. आर. ए. जोशी, कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती डॉ. डी. जी. सावंत व इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आर. एस. गोरे हे मंचावर उपस्थित होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना डॉ. गोरे यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी पूर्णपणे तयार असणे गरजेचे असून त्यासाठी त्यांनी सर्व प्रकारची पूर्व तयारी केली पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यानंतर डॉ. जोशी यांनी परीक्षेविषयी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यामध्ये परीक्षा काळात विद्यार्थ्यांवर कसा ताण येतो व तो कसा विद्यार्थ्यांनी हाताळावा याबद्दल मार्गदर्शन केले. अभ्यासाचे व्यवस्थित नियोजन केले तर परीक्षेत ताण येणार नाही असे मत त्यांनी मांडले. त्यानंतर कार्यशाळेचे साधन व्यक्ती डॉ. सावंत यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी व त्या दृष्टीने कसे तयार राहावे याचे सखोल असे मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी परीक्षेला लागणाऱ्या साहित्य पासून ते परीक्षा वर्गात आल्यानंतर विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याबद्दल सांगितले. त्यानंतर आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य तळणीकर यांनी विद्यार्थ्यांनी परीक्षेचा कोणताही अतिरिक्त ताण घेऊ नये असे आवाहन करून विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आर. एस. गोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. बी. बी. घुटे यांनी केले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती होती. सदरील कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. (शहर प्रतिनिधी)

